दिनांक : ७.०१.२०१९

सन २०१६ -१७ ते सन २०१९- २० या चार वर्षासाठी मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या सर्व पाणी पुरवठा योजनांबाबत माहिती

## ❖ मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता :

- महाराष्ट्र राज्यात केंद्र शासन पुरस्कृत **राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम** हा एकमेव कार्यक्रम सन २००९-१० पासून राबविण्यात येत आहे. पाणी पुरवठा या मुलभूत बाबींसाठी राज्य शासन स्तरावर स्वतंत्रपणे कोणताही कार्यक्रम राबविण्यात येत नसल्यामुळे, केंद्र शासनावर पुर्णपणे अवलंबून रहावे लागत आहे. तसेच, केंद्र शासनाकडून राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमासाठी तुर्त निधी वितरणात केलेली कपात व राज्याचे केंद्र शासनावरील असलेले अवलंबित्व याबाबींचा विचार करता ग्रामीण जनतेस पुरेसे व शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी व ग्रामीण भागांमध्ये ( गावे/वाडया/वस्त्या ) पाणी पुरवठा योजना राबविण्यासाठी राज्य शासनातर्फे मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम राबविण्यात येत आहे.
- मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम शासन निर्णय क्र. ग्रापाधो-१११५/प्र.क्र. ९२/पापु-०७ दि. ०७-०५-२०१६ अन्वये राज्यभरात सन २०१६ -१७ ते सन २०१९- २० या चार वर्षासाठी राबविण्यात येत आहे.

## ❖ सदर कार्यक्रमाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यात आले आहे.

| अ.क्र | योजना | योजनांची संख्या |
|---|---|---|
| (अ) | मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत हाती घ्यावयाच्या नवीन योजना. | १००३ योजना<br>( स्वतंत्र पाणी पुरवठा योजना = ९७२ योजना)<br>( प्रादेशिक पाणी पुरवठा योजना =३१ योजना) |
| | | दि. १८.०४.२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार ११९ योजना वगळण्यात आल्या व २५ योजना समाविष्ट करण्यात आल्या त्यानुसार १००४-११८+२५=९११ योजनांचे उद्दिष्ट |
| (ब) | राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत बंद असलेल्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन. | ८३ योजना<br>( मजीप्रा = ३८ योजना )<br>(जिप /ग्रापं/शिखर समिती =४५ योजना) |
| (क) | प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती. | ५३१ योजना<br>( मजीप्रा = १७८ योजना )<br>(जिप /ग्रापं/शिखर समिती = ३५३ योजना) |

## ❖ सदर कार्यक्रम चार वर्ष राबविण्याकरीता रु. २५३०.८६ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम (MRDWP) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा योजनांचे सनियंत्रण वासो कार्यालयातर्फे करण्यात येते.

## ❖ मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या सद्यस्थितीबाबत गोषवारा :

**अ) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत हाती घ्यावयाच्या नवीन योजना.**

| प्रादेशिक विभाग | ७ मे २०१६ रोजी व १८ एप्रिल २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार समाविष्ट योजनांची एकूण संख्या | मंजूर झालेल्या योजनांची एकूण संख्या | कार्यादेश दिलेल्या योजनांची संख्या |
|---|---|---|---|
| कोकण | ६६ | ४७ | ३९ |
| पुणे | १४१ | १२८ | ९० |
| नाशिक | २११ | १७९ | १४४ |
| औरंगाबाद | २३६ | १९९ | १७१ |
| अमरावती | ७६ | ६५ | ५५ |
| नागपूर | १८१ | १६२ | १४२ |
| एकूण | ९११ | ७८० | ६४१ |

**(ब) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत बंद असलेल्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन.**

| कार्यादेश देण्यात आलेल्या योजनांची संख्या | | योजनेची मंजूर किंमत (रु.लक्ष) (ढोबळ) |
|---|---|---|
| कोंकण (मजीप्रा) | ० | ०.०० |
| पुणे (मजीप्रा) | ० | ०.०० |
| नाशिक (मजीप्रा) | १ | ५०८.७७ |
| औरंगाबाद (मजीप्रा) | २ | २०३.७८ |
| अमरावती (मजीप्रा) | १० | १४११.९७ |
| नागपूर (मजीप्रा) | ४ | २३८.६७ |
| धुळे (जिप) | १ | १०९.३३ |
| एकूण | १८ | २४७२.५२ |

**क) प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान.**

शासन निर्णय क्र. मुपेयो-२०१७/प्र.क्र.०१/पापु-१९ दि. १९ जानेवारी २०१७ व मुपेयो-२०१७/प्र.क्र.४०/पापु-१९दि. २१ मार्च २०१७ अन्वये निर्गमीत झालेल्या मार्गदर्शनानुसार वासो कार्यालयात प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची छाननी केली जाते.

## गोषवारा

माहे जून २०१८

| अ.क्र. | अंमलबजावणी यंत्रणा | एकूण प्राप्त प्रस्ताव (संख्या) | अपात्र प्रस्तावांची संख्या | पात्र प्रस्तावांची संख्या | पात्र प्रस्तावांचे वितरीत केलेल्या प्रोत्साहन अनुदान (रु.) लाख |
|---|---|---|---|---|---|
| १ | मजीप्रा | २४ | १७ | ७ | १११.३४ |
| २ | भंडारा जि.प. | ७ | ३ | ४ | १२.६० |
| ३ | अहमदनगर जि.प. | १५ | - | १५ | ४४.२९ |
| ४ | गडचिराली जि.प. | १ | १ | - | - |
| ५ | वर्धा जि.प. | ५ | ५ | - | - |
| ६ | चंद्रपूर जि.प. | ३५ | ३५ | - | - |
| **एकूण** | | **८७** | **६१** | **२६** | **१६८.२३** |

शासन निर्णय क्र. मुपेयो-२०१७/प्र.क्र.४०/पापु-१९दि. २१ मार्च २०१७ अन्वये रु. ५५ कोटी वासो कार्यालयास प्राप्त झाले. त्यापैकी रु. १.६८ कोटी वितरीत करून उर्वरित निधी . ३१ मार्च २०१८ रोजी शासनाला परत करण्यात आले.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग अंतर्गत शासन निर्णय क्रमांकः मुपेयो-२०१७/प्र.क्र.१३/पापु-१९ (शिकाना) दि. ३१ मार्च २०१८ अन्वये रु. १२ कोटी या कार्यालयास प्राप्त झाले आहेत. तसेच, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग अंतर्गत शासन निर्णय क्रमांकः मुपेयो-२०१७/प्र.क्र.०१/पापु-१९ दि. २६ नोव्हेबर २०१८ अन्वये देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदानाबाबत निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांवर या कार्यालयातर्फे कार्यवाही करण्यात येत आहे.